# बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक १९ | बुधवार, दि.१५ ते २१ एप्रिल २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## मांग-गारोडी वस्तीमध्ये २५ घरकुलांचा सामुहिक गृहप्रवेश सोहळा

**गोंदिया** : समाजातील शेवटच्या घटकातील मुला-मुलींनीही शिक्षण प्रवाहात येणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांनी अण्णाभाऊ साठेनगर, कुडवा येथे आयोजित कार्यक्रमात केले.मांग-गारोडी समाजातील



जवळपास ४० कुटुंब मागील कित्येक वर्षांपासून कुडवा या परिसरात राहत असून हा समाज मुख्य प्रवाहापासून आणि शिक्षणापासून वंचित राहिलेला आहे, यांनी मुख्य प्रवाहात यावे असे आवाहन एम. मुरुगानंथम यांनी केले.

सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाद्वारे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह दि.८ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने अण्णाभाऊ साठेनगर येथील मांग-गारोडी वस्तीमध्ये सोमवारी २५ घरकुलांचा सामुहिक गृहप्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. यावेळी समाज कल्याण सहायक आयुक्त किशोर भोयर, ग्रामपंचायत कुडवा सरपंच बाळकृष्ण पटले, सामाजिक कार्यकर्त्या डॉ.सविता बेदरकर, माजी सरपंच श्यामदेवी ठाकरे, माजी ग्रामविकास अधिकारी कृष्णकुमार नागपूरे व वस्तीतील प्रतिष्ठित नागरिक विजय पात्रे मंचावर उपस्थित होते.

एम. मुरुगानंथम म्हणाले, भारतीय नागरिक म्हणून सर्वांसाठी ङ्कसंविधानफ सारखेच आहे. मांग-गारोडी समाजाच्या उत्थानासाठी समाज कल्याण विभाग कसोशीने प्रयत्न करीत आहे. या समाजातील नागरिक आतापर्यंत पाल टाकून राहत होते. सदर समाजाच्या वस्तीत मुलभूत सुविधा तसेच शासनाच्या योजनांचा लाभ घेण्याकरीता आवश्यक कागदपत्रे/ओळखपत्रे नव्हती. परंतु समाज कल्याण विभागाने या समाजाच्या उत्थानासाठी अथक प्रयत्न करुन रमाई आवास (ग्रामीण) योजनेअंतर्गत घरकुल मंजूर करुन २५ घरकुलांचे बांधकाम करुन दिलेले आहे. त्यामुळे आता आपले स्वत: चे हक्काचे घर निर्माण झाले असल्यामुळे याचा आनंद या समाजातील लोकांच्या चेहऱ्यावर दिसून येत आहे असे त्यांनी सांगितले.कोणतेही कागदपत्रे नसतांना सुध्दा आपल्या समाजासाठी घरकुल मंजूर करण्यात आले, ही या वस्तीसाठी आनंदाची बाब आहे. या वस्तीतील नागरिकांचे जन्म प्रमाणपत्र, राशन कार्ड, जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व वीजेची सोय उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा प्रशासन स्तरावर मी नक्कीच प्रयत्न करेन अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

प्रास्ताविक समाज कल्याण सहायक आयुक्त किशोर भोयर यांनी केले.याप्रसंगी मांग-गारोडी समाजाच्या विकासाकरीता उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल माजी सरपंच कुडवा श्यामदेवी ठाकरे, माजी ग्रामविकास अधिकारी कृष्णकुमार नागपुरे, समाज कल्याण विभागाचे लक्ष्मण खेडकर यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच २५ घरकुलांचा मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम यांच्या शुभहस्ते रिबीन कापून व भारतीय संविधानाची प्रास्ताविका लाभार्थी कुटुंबांना भेट देऊन गृहप्रवेश करण्यात आले.सुत्रसंचालन समाज कल्याण निरीक्षक स्वाती कापसे यांनी केले.उपस्थितांचे आभार हेमंत घाटघुमर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समाज कल्याण निरीक्षक राजेश मुधोळकर यांचेसह गिरीधर गोबाडे, प्रमोद गणवीर, अमर बुल, निवेदिता बघेले, आशिष जांभुळकर, माणिकराव इरले, योगेश हजारे, पुष्पलता धांडे, रोहिणी रामटेके, पंकज काळे, चंद्रकिशोर मेश्राम, प्रकाश मेश्राम व क्रिस्टल कंपनीचे कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची १३५ वी जयंती गोंदिया जिल्ह्यात उत्साहात साजरी







**गोंदिया–** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आज (दि.१४ एप्रिल) देशभरात उत्साहात साजरी केली जात आहे. देशात समता प्रस्थापित करणाऱ्यासाठी आयुष्य खर्ची घालणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करताना देशातील लाखो लोकं आनंदाने मिरवणुकीत सहभागी झाले असून गोंदिया जिल्हाच नव्हे शहरही निळे झाले आहे.शहराच्या विविध कानाकोपऱ्यातून निघालेल्या मिरवणुकातील बहुजन समाज बांधवानी जयस्तंभ चौकात पोचून भारतरत्न डॉ.आंबेडकरांना अभिवादन केले.ओबीसी अधिकार मंच,युवा बहुजन एकता मंच,ओबीसी संघर्ष समितीचे खेमेंद्र कटरे,कैलास भेलावे, शिशिर कटरे, प्रेमलाल साठवणे, सुनिल भोंगाडे, रवी भांडारकर, बंटी पंचबुध्दे, गौरव बिसेन,मनोज मेंढे.गणेश तुरकर, संजिव रहागंडाले यांच्यासह, आसरा संस्थेसह,काँग्रेस,भाजप राष्ट्रवादीच्या नेत्यांनीही अभिवादन केले.

**गोंदिया–** भारतीय संविधान रचना, विश्वरत्न, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी भवन, रेलटोली कार्यालय येथे मोठ्या उत्साहात साजरी केली.माजी आमदार राजेंद्र जैन आणि पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी महापुरुष परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या छायाचित्राला माल्यार्पण केले.यावेळी नानू मुदलियार, राजू जैन, खालिद पठान, भगत ठकरानी, लोकेश यादव, अमित भालेराव, संजीव राय, माधुरी नासरे, वर्षा बैस, करण टेकाम, विनायक शर्मा, दीपक कनोजे, नागो बंसोड, हरबख्श गुरनानी, लखन बहेलिया, दिनेश गुरनानी, लखन बहेलिया, एनवर्धन गेंडा, सुनील पटले, अनिल पटले तुषा उके, प्रशांत सोनपुरे, कपिल बावनथडे, सोनल मेश्राम, बंटी डोंगरे, कोणी थेल बावनथडे, वामन गेडाम आदि उपस्थित होते.

**गोंदिया** डॉ. बाबासाहेबक आंबेडकर यांच्या जयंती पर्वानिमित्ता युवकांच्यावतीने शहरात भव्य मोटरसाइकिल रैलीचे आयोजन करण्यात आले होते.काँग्रेसचे युवा नेते प्रफुल गोपालदास अग्रवाल आणि काँग्रेस कार्यकर्त्यांनी मामा चौक येथे रॅलीचे भव्य स्वागतकरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर का अभिवादन केले.यावेळी अशोक (गप्पु), मनोज पटनायक, नगर परिषद गटनेता राकेश ठाकुर,न.प.सभापती पिंटू माने,अमर रंगारी, संजु माने, बाबा बागडे, उपसभापती राजकुमार (पप्पू) पटले, गोल्डी गावंडे उपस्थित होते.

## बाबासाहेबांचे विचार जगाला दिशा देणारे: आमदार बडोले



**अर्जुनी–मोर–** प्रज्ञा बुद्ध विहार समिती, डव्वा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य भीमगीत नृत्य स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमाला आमदार राजकुमार बडोले यांची प्रमुख उपस्थिती लाभली.या प्रसंगी पं.स. सभापती चेतन वडगाये, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक गंगाधर परशुरामकर, पं.स. सदस्य शालिंदर कापगते, आनंद चंद्रिकापुरे , जि.प. सदस्य शैलेश नंदेश्वर, अभिनेत्री कु. क्रीनल मुनेश्वर, माजी सरपंच पुष्पमाला बडोले, माजी सरपंच दिनेश कोरे , सरपंच योगेश्वरी चौधरी, सरपंच हशीना जांभुळकर, , खेमलता राऊत, सेवानिवृत्त मुख्याध्यापक रमेश बडोले, उपसरपंच हंसराज राऊत, राकेश जैन, एकनाथ गायधने, दिलेश्वरी कुरसुंगे, संगीता घासले, विजय गावराने, मंगला कुरसुंगे तसेच इतर मान्यवर, समाजबांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नौकाविहारामुळे पर्यटन विकासाला चालना मिळणार

**नवेगावबांध :–** गोंदिया जिल्ह्यात प्रथमच नवेगावबांध जलाशयात एस. के. इन्फ्राने नौकाविहार सुरू केला आहे; यामुळे जिल्ह्यातील नागरिकांसह परिसरातील पर्यटनप्रेमी व निसर्गप्रेमींसाठी ही एक आकर्षक सुविधा उपलब्ध झाली आहे. या सुविधेमुळे जिल्ह्यातील पर्यटन विकासाला चालना मिळणार आहे. पर्यटकांना नवेगावबांध येथील नैसर्गिक सौंदर्याचा आनंद घेत नौकाविहार करता येणार आहे. या प्रकल्पातून रोजगार निर्मितीलाही चालना मिळून अनेक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे प्रतिपादन खासदार प्रफ ुल्ल पटेल यांनी केले.

येथील राष्ट्रीय उद्यानातील जलाशयावर नौकाविहार बोटिंग सुविधेचे लोकार्पण बुधवारी (दि. ८) खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या हस्ते व आमदार राजकुमार बडोले व माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर, देवेंद्रनाथ चौबे, चंद्रपाल चौकसे, आम्रपाली डोंगरवार, रचना गहाणे, गंगाधर परशुरामकर, अविनाश काशीवार, केवलराम पुस्तोडे, संदीप कापगते, प्रमोद लांजेवार, शैलेश जायस्वाल, नामदेव डोंगरवार, दादाजी फुंडे, नितीन पुगलिया, होमराज पुस्तोडे, पुष्पलता द्रुगकर, अनिरुद्ध कांबळे, समीर बन्सोडे, किशोर तरोणे, लोकपाल गहाणे, सुनील तरोणे, राकेश लंजे व पर्यटक उपस्थित होते.

आमदार बडोले यांनी यावेळी मार्गदर्शन करताना नवेगावबांध पर्यटनस्थळाचा विकास करण्यास भरपूर वाव आहे. या माध्यमातून स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे शासनाकडे यासाठी पाठपुरावा करून या ठिकाणी पर्यटकांना अधिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही आमदार बडोले यांनी दिली.



**नवेगावबांधकडे वाढतोय पर्यटकांचा लोंढा**

**गोंदिया जिल्ह्यातील नवेगावबांध येथे मोठे जलाशय असून या ठिकाणी विविध विदेशी पक्षी दाखल होतात. त्यामुळे पक्षी आणि पर्यावरणप्रेमींसाठी ही एक पर्वणीच असते. तसेच नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प यांमुळे पर्यटकांचे नवेगावबांधकडे आकर्षण वाढत असून, येथे येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत वाढ होत असल्याचे चित्र आहे.**

## कठडा नसलेल्या विहीरीने घात केला, वाघाचा बुडून मृत्यू



**गोंदिया:–** निसर्गाच्या कुशीत मुक्त संचार करणाऱ्या वनराजालाच मानवी दुर्लक्षाचा बळी जावे लागल्याची हृदयद्रावक घटना नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या बफर परिसरात उघडकीस आली आहे. तिरोडा वनपरिक्षेत्रातील माल्ही बिट अंतर्गत कोडेलोहारा परिसरात एका शेतातील कठडे नसलेल्या विहिरीत पडून सुमारे ४ ते ५ वर्षे वयाच्या वाघाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आज रविवार सकाळी १० वाजताच्या सुमारास उघडकीस आली.या घटनेने वन्यजीव संवर्धनाच्या प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, ग्रामीण भागातील उघड्या विहिरींच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, कोडेलोहारा येथील शेतकरी रुपचंद इसन कावळे यांच्या शेतातील विहिरीत वाघ पडल्याची माहिती मिळताच नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे जलद बचाव पथक आणि भंडारा वनविभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले.नवेगाव नागझिराचे उपसंचालक प्रितमसिंग कोडापे, सहायक वनसंरक्षक विजय धांडे, कु. मनिषा चव्हाण, तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी रविकमल भगत आणि कु. टेंभरे यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला. प्राथमिक तपासात असे समोर आले की, वाघ हा शिकार करताना एखाद्या भक्ष्याचा पाठलाग करत असताना अचानकपणे कठडे नसलेल्या विहिरीत पडला असावा. या विहिरीची उघडी रचना आणि सुरक्षिततेचा अभाव हा या दुर्घटनेचा मुख्य कारणीभूत घटक ठरत असल्याचे वनाधिकाऱ्यांचे मत आहे.

दरम्यान, जिल्हाधिकारी गोंदवले यांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. शवविच्छेदनासाठी एनटीसीएचे प्रतिनिधी, वन्यजीव रक्षक आणि पशुवैद्यकीय अधिकारी प्रविण सोनवाणे,मेघराज तुलावी उपस्थित होते.सदर प्रकरणात पुढील तपास कु. मनिषा चव्हाण, सहायक वनसंरक्षक, नविन नागझिरा यांच्या नेतृत्वाखाली श्री. रविकमल भगत, वनपरिक्षेत्र अधिकारी तिरोडा (वन्यजीव) व त्यांचे चमू करीत आहे.सदर प्रकरणाचा पुढील तपास सहायक वनसंरक्षक मनिषा चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली वनपरिक्षेत्रअधिकारी रविकमल भगत व त्यांची चमू करीत आहे.या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, शेतातील उघड्या विहिरींना कठडे बांधण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

## लॉयड्स इन्फिनिट फाउंडेशनकडून असहाय "मथुरा"ला मदतीचा हात

**गडचिरोली :–** जिल्ह्यातील देसाईगंज येथे पोलीस कोठडीतील लैंगिक अत्याचाराच्या घटनेने पाच दशकांपूर्वी देशभर गाजलेल्या आणि संबंधित कायद्यात महत्त्वपूर्ण बदल घडविण्यासाठी कारणीभूत ठरलेल्या वेदनादायक घटनेतील पीडित "मथुरा' सध्या वृद्धापकाळात असहाय जीवन जगत आहे. तिला आधार देण्यासाठी लॉयड्स इन्फिनिट फाउंडेशनकडून पाच लाखांची मदत देण्यात आली.

वयाच्या ७२ व्या वर्षी ती पीडित महिला आज महाराष्ट्राच्या दुर्गम भागात अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहे. मोडकळीस आलेल्या झोपडीत राहणे, पक्षाघाताशी झुंज देणे, तसेच अन्न, आरोग्य सेवा आणि सुरक्षित निवारा यासारख्या मूलभूत गरजांचा अभाव, अशा गंभीर समस्यांना त्या सामोरे जात आहे. ज्या प्रकरणामुळे लाखो लोकांसाठी कायदेशीर संरक्षण निर्माण झाले, त्याच व्यक्तीला आज मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे, हे अत्यंत खेदजनक असल्याचे नमुद करत लॉयड्स इन्फिनिट फाऊंडेशनने पीडितेची व तिच्या कुटुंबाची दयनीय परिस्थिती पाहून तातडीने मदत देण्यासाठी पुढाकार घेतला.

लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे अध्यक्ष मुकेश गुप्ता यांनी लॉयड्स इन्फिनिट फाउंडेशन (LIF) मार्फत त्यांच्या सामाजिक दायित्व उपक्रमांतर्गत? ५ लाखांची आर्थिक मदत दिली. ही रक्कम सुरक्षित घर बांधण्यासाठी, तसेच इतर आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी देण्यात आली. लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक बी.प्रभाकरन यांनी नमूद केले की, मथुराची कहाणी समाजावर मोठा प्रभाव टाकणारी ठरली असली तरी त्यांच्या स्वतःच्या जीवनात तितकीच सहानुभूती दिसून आली नाही. इतक्या महत्त्वाच्या व्यक्तीला अजूनही मूलभूत सन्मानासाठी झगडावे लागत आहे, हे अत्यंत वेदनादायक आहे अशी भावना व्यक्त करत त्यांनी लॉयड्स इन्फिनिट फाउंडेशनतर्फे त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची आणि त्यांना योग्य सन्मान व प्रतिष्ठा मिळवून देण्याची वचनबद्धता व्यक्त केली.पीडित महिलेच्या कुटुंबाला प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) अंतर्गत जोडण्यात आले असून, त्यांना दीर्घकालीन निवासाची सुविधाही मिळणार आहे. लॉयड्सचे अध्यक्ष मुकेश गुप्ता यांच्या समावेशक विकास व सामाजिक जबाबदारीप्रती असलेल्या बांधिलकीचे हे प्रतीक आहे. लॉयड्स इन्फिनिट फाउंडेशनकडून दिली गेलेली मदत ही सरकारी प्रयत्नांना पूरक ठरून कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडथळ्यांना दूर करण्यासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे.

## ओबीसी संघटनांचा जनगणनेवर बहिष्कार



**गोंदिया :–** ओबीसी संघर्ष कृती समिती गोंदिया जिल्हा आणि ऑल ओबीसी ऑर्गनायझेशन यांनी आयोजित केलेली एक बैठक नुकतीच गोंदिया येथे पार पडली. सभेत आगामी जनगणनेविरोधात तीव्र विरोधाचे आवाज उठले. आपल्या दीर्घकाळापासूनच्या मागण्या पूर्ण न झाल्याने, ओबीसी संघटनांनी एकत्रितपणे जनगणनेवर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली आहे. या संदर्भात स्थानिक शिक्षक सहकारी पत संस्थेच्या सभागृहात सभापार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष बबलू कटरेसह इतर पदाधिकाऱ्यांनी हा निर्णय घेतला.

जनगणनेच्या अर्जातील प्रश्न क्रमांक १२ मध्ये ओबीसींचा समावेश नसल्यामुळे गेल्या चार वर्षांपासून नगरपरिषदेच्या निवडणुका घेण्यात आल्या आहेत. आता तीच चूक पुन्हा केली जात आहे. जनगणनेच्या अर्जातील प्रश्न क्रमांक १२ मध्ये एससी आणि एसटीप्रमाणेच ओबीसी, ईडब्ल्यूएस आणि इतरांचाही समावेश असायला हवा होता, जेणेकरून प्रत्येक सामाजिक गटाला सरकारी नोकऱ्या आणि सरकारी योजनांमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळू शकेल, तसेच ओबीसी समुदायाला नगरपरिषद, जिल्हापरिषद आणि इतर सरकारी संस्थांमध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळू शकेल. ओबीसी समुदायाच्या संघटनांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जोपर्यंत जनगणनेच्या अर्जातील प्रश्न क्रमांक १२ हटवला जात नाही, तोपर्यंत ते कोणत्याही निवडणुका घेणार नाहीत.

जोपर्यंत प्रश्न क्रमांक १२ मध्ये ओबीसी लिहिले जात नाही, तोपर्यंत ते कोणत्याही जनगणना अधिकाऱ्याला गावात प्रवेश करू देणार नाहीत किंवा कोणतीही माहिती देणार नाहीत. एससी आणि एसटी प्रमाणे जनगणनेच्या प्रश्न क्रमांक १२ मध्ये ओबीसी समाजाचा समावेश करण्यासाठी ते बऱ्याच काळापासून संघर्ष करत आहेत. केंद्र सरकारने वारंवार आश्वासन देऊनही,जनगणनेच्या प्रश्न क्रमांक १२ मध्ये ओबीसी समाजाचा समावेश करण्यात आलेला नाही. ओबीसी समाजाचा युक्तिवाद आहे की, जर जनगणनेच्या प्रश्न क्रमांक १२ मध्ये ओबीसी समाजाचा समावेश झाला नाही, तर ओबीसी समाजाच्या पुढच्या पिढीला शिक्षण, नोकऱ्या, सरकारी योजना किंवा राजकीय प्रतिनिधित्व मिळणार नाही. आपले अस्तित्व वाचवण्यासाठी, ओबीसी समाजाने एससी आणि आदिवासी समाजासोबत संयुक्तपणे जनगणनेवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे. यावेळी ओबीसी संघटनेचे अमर वराडे, कैलाश भेलावे, सोमेश्वर वंजारी, विजय फुंडे, प्रेमलाल साठवणे, मनोज शरणागत, सुनिल पटले, मनोज मेंढे, गणेश बरडे, गौरव बिसेन, सुनिल भोंगाडे यासह मोठ्या संख्येने ओबीसी बांधव उपस्थित होते.

## भावपूर्ण श्रद्धांजली



**स्व.ताराबाई हिरदीलाल कटरे**

जन्म दि.02.01.1942 मृत्यु दि.06.04.2026

यांचे सोमवारी दि.०६/०४/२०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. तरी त्यांच्या आत्म्यास चिर:शांती लाभो हिच ईश्वर चरणी प्रार्थना.
भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत
आपल्या जीवनातील प्रेरणादायी आठवणी आणि दिलेला आधार सदैव आमच्या सोबत राहील.
आपण सर्वजण श्रद्धांजली (तेरहवी) कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

**दशक्रिया विधी :-** गुरुवार दि.१६/०४/२०२६ रोजी सकाळी १० वाजता रजेगाव घाट येथे होणार आहे.

**श्रद्धांजली व तेरहवी कार्यक्रम :-** रविवार दि.१९/०४/२०२६ ला दुपारी १ वाजेपासून,कुणबी समाज भवन,किंडगीपार रोड आमगाव.

**शोकाकुल :-** समस्त कटरे परिवार दवडीपार
बेरार टाईम्स,परिवार गोंदिया

## संपादकीय

# प्रज्ञासुर्य महामानवांचे स्मरण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती. १८९१ मध्ये ते जन्मले आणि १९५६ मध्ये वारले, पण या मधल्या काळात त्यांनी जगाला प्रचंड काही दिले. त्यांनी भारताला संविधान दिले. आज त्या संविधानाच्या बळावर तर भाजप,काँग्रेससह अनेक पक्ष उड्या मारत आहेत. पण आंबेडकर यांनी संविधानासारखी अद्भूत गोष्ट तर दिलीच, पण त्याशिवायही त्यांनी भारतावर एक उपकार केले आहेत. प्रत्येक भारतीयाने त्याचे कृतज्ञतापूर्व स्मरण केले पाहिजे. ती आहे ती म्हणजे त्यांनी देशाला मुस्लीम राष्ट्र होऊ दिले नाही. जेव्हा त्यांनी हिंदू म्हणून मरायचे नाही असे ठरवले तेव्हा अनेक धर्म त्यांच्या पुढे पदर पसरून तुम्ही आमचा धर्म स्वीकारा म्हणून स्वागतार्थ पायघड्या घातल्या होत्या. त्यात मुस्लीमही होते. पण बाबासाहेबांनी तसला अविचार केला नाही व बौद्ध धर्म स्वीकारला आणि देशाचे आज एक अनोखे रूप आपण पाहत आहोत. यामागे बाबासाहेबांचे विचार आणि त्यांची दूरदृष्टी आहे.

बाबासाहेबांनी देशाला एक फार मोठी बाब दिली आहे ती म्हणजे या देशाची घटना. संविधानाच्या जोरावर आज जे राहुल गांधी आणि तमाम काँग्रेसजन उड्या मारत आहेत त्यांना बाबासाहेबांनी ही भेट दिली आहे. तिचा दुरुपयोग कसा केला हे आपण पाहातच आहोत. पण बाबासाहेबांनी या देशाला संविधान रूपी शस्त्र देऊन तमाम भारतीयांना फार मोठे साधन दिले आहे. बाबासाहेबांनी भारतावर अनेक प्रकारे उपकार केले आहेत त्यापैकी एक आहे ती म्हणजे त्यांनी जीवनभर वंचित आणि शोषितांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या उत्थानासाठी संघर्ष केला. त्यांनी त्यासाठी समाजातील शोषित आणि वंचित अशा दलित समाजा–तील वर्गात जागृती केली आणि भारतीय संविधान तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

हिंदू म्हणून जन्मलो असलो तरीही हिंदू म्हणून मरणार नाही हे वाक्य त्यांनी तंतोतंत पाळले आणि बौद्ध धर्म स्वीकारला आणि त्यांच्यासमवेत त्यांच्या लाखो अनुयायांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. १४ ऑक्टोबर १९५६ या दिवशी त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि त्यांच्यासम वेत तीन लाख ६५ हजार अनुयायांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. हिंदू धर्मात जात्यंधता आणि इतर अनेक दुर्गुण होते त्यामुळे बाबासाहेबांना धर्म बदलावा लागला पण त्यांचा धर्मपरिवर्तनाचा निर्णय १९३६ मध्येच झाला होता असे इतिहास सांगतो. दलितांच्या उत्थानात हिंदू असणे हा मोठा अडसर आहे असे त्यांचे मत होते. हिंदू धर्माची जातीयता आणि जातीची उतरंड त्यांना न पटणारी होती आणि त्यामुळे त्यांनी हिंदू धर्म सोडण्याचा निर्णय घेतला. पण त्यांना अन्य कोणताही धर्म स्वीकारावा वाटला नाही हे त्यांचे मोठेपण होते.

आपण त्याच्याबद्दलल बोलताना त्यांचे हे मोठेपण कधीच मान्य करत नाही. त्यांचे बौद्ध धर्मात प्रवेश करणे ही हिंदूंची जातीव्यवस्था नाकारण्याची प्रतिक्रियात्मक आणि लाक्षणिक कृती होती आणि त्यांनी समानतेच्या प्रति असलेली कटिबद्धतेशी सुसंगत होती. त्यामुळे त्यांच्या या कृतीकडे केवळ धर्मपरिवर्तन म्हणून न पहाता हिंदू धर्मातील दोष काढून टाकण्याच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. बाबासाहेबांनी लाखो दलितांच्या लेकरांना स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव करून दिली आणि एक प्रकारचे आत्मभान दिले असे म्हणावे लागेल. बाबासाहेब विद्वान तर होतेच. त्यांनी त्यांचे ग्रंथालय अद्ययावत अशा ग्रंथांनी सुसज्ज केले होते आणि त्यांचे परिशीलन त्यांनी आयुष्यभर केले. त्यांनी सतत समानतेसाठी आणि समाजातील जातीभेद दूर करण्यासाठी काम केले त्याला तोड नाही. आज त्यांची गरज प्रकर्षाने जाणवते आहे कारण आज समाजात जातिभेद प्रचंड प्रमाणात फोफावला आहे आणि उच्चनीच भेद प्रचंड प्रमाणात वाढले आहेत. त्यामुळे आज तर बाबासाहेबांची गरज तर जास्तच जाणवते आहे.

बाबासाहेबांनी धर्म परिवर्तन केवळ हौस किंवा लहर म्हणून केले नाही तर त्यामागे संयुक्तिक कारण, नैतिकता आणि न्याय ही तत्वे होती. याच तत्वांसाठी त्यांनी आयुष्यभर काम केले आणि संघर्ष केला. बाबासाहेबांनी समाजातील जातीयता नष्ट करण्यासाठी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला आणि ती भूमी आज परमपवित्र भूमी म्हणून महाडमध्ये गणली जाते. दलित समाजाच्या व्यक्तीना माणूस म्हणून दर्जा मिळवून देणे आणि त्यांचा आत्मसन्मान वाढवणे हे त्यांच्या या कार्याचा लसावि होता असे म्हणावे लागेल. आपल्या पुस्तकात अनिहिलेशन ऑफ कास्ट या पुस्तकात त्यांनी हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेवर कोरडे ओढले आ–हेत. बाबासाहेबांनी बौद्ध धर्मात प्रवेश का केला यावर आजही चर्चा होत असतात. पण काही विद्वानांच्या मते त्यांनी आकसाने बौद्ध धर्मात प्रवेश केलेला नाही, तर त्यांनी हिंदू धर्माला सुधारण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण त्यांन त्यात यश आले नाही असे म्हणून ठेवले आहे.

या महामानवाला वंदन करण्यामागे त्यांचे केवळ बौद्ध धर्म स्वीकारणे हेच एक कार्य नव्हते तर त्यांनी अनेक दिग्गज हिंदू नेत्यांशी चर्चाही केली होती. त्यात सावरकर होते तसेच टिळकांचा मुलगाही होता. त्यामागे बाबासाहेबांनी आकसाने बौद्ध धर्म स्वीकारला असे म्हणणे चूक आहे. त्यांनी राजकारण केले आणि पहिले ते देशाचे कायदामंत्री होते. त्यांनी समाजाचे प्रबोधन केले आणि हिंदू धर्मावर कोरडे ओढले. पण हिंदू धर्मामुळे त्यांचे कधीही समाधान झाले नाही आणि शेवटी त्यानी हिंदू धर्म सोडण्याचा निर्णय घेतला. बाबासाहेब आजही महत्त्वाचे आहेत कारण त्यांनी जी शिकवण दिली आहे तिची आज गरज कधी नव्हे ती जास्त आहे. ६५ वर्षांच्या आयुष्यात बाबासाहेबांनी दलितांना आत्मसन्मान दिला आणि त्यांना शिकले तरच त्यांचा टिकाव लागेल हे तत्त्व शिकवले. त्यानी राखीव मतदारसंघांचा आग्रह धरला आणि त्यासाठी महात्मा गांधी आणि आंबेडकर यांच्यात करारही झाला. पण काँग्रेसने तो करार उधळून ला–वला आणि काँग्रेसने कधीही दलिताना बरोबरचे स्थान दिले नाही. केवळ भाषा मात्र त्यांच्या कल्याणाची करायची आणि पंगतीत त्याचा अपमान करायचा हे शेतकरी नेते नारायण नागू पाटील यांनी आपल्या पुस्तकात लिहून ठेवले आहे. आपल्या ६५ वर्षांच्या काळात आभाळाएवढे कार्य करणाऱ्या बाबासाहेबांना त्रिवार वंदन.

# सामाजिक क्रांतीचे दीपस्तंभ : महात्मा जोतीराव फुले

भारताच्या सामाजिक इतिहासात ११ एप्रिल हा दिवस केवळ एका महापुरुषाच्या जन्माचा दिवस नाही, तर समता, शिक्षण आणि मानवतेच्या नव्या युगाची सुरूवात करणारा दिवस आहे. महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांच्या जन्मामुळे भारतीय सम ाजव्यवस्थेला नवी दिशा मिळाली. सन १८२७ मध्ये जन्मलेल्या या युगपुरुषाच्या विचारांचा प्रकाश आजही समाजाच्या प्रत्येक स्तरावर जाणवतो. ११ एप्रिल पासून महात्म ा ज्योतिबा फुले द्विशताब्दी जयंती वर्ष साजरे केले जाणार आहे.

महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात द्विशताब्दी जयंती समिती स्थापन केली आहे. समाजातील समता, शिक्षण, स्त्री–सक्षमीकरणांचे विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याचा राज्य सरकारने संकल्प केला आहे. त्याम ुळे ११ एप्रिलचा दिवस भारताच्या सामाजिक समतेच्या तेजस्वी द्विशताब्दी पर्वाचा दिवस म्हणूनही देशात साजरा होत आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या पार्श्वभूम ीवर त्यांच्या कार्याचा पुनर्विचार करणे म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण नसून वर्तमानाला दिशा देण्याचे कार्य आहे.

### मानवतेचा धर्म : समतेचा मूलाधार

महात्मा फुले यांच्या विचारविश्वाचा केंद्रबिंदू म्हणजे “मानव हा सर्वात मोठा धर्म आहे” ही भूमिका. त्यांनी धर्म, जात, पंथ यापलीकडे जाऊन माणुसकीचा विचार मांडला. त्यांच्या लेखनात आणि कृतीतून सतत दिसून येते की, समाजातील अन्याय आणि विषमता दूर केल्याशिवाय खरी प्रगती होऊ शकत नाही. त्यांनी मांडलेली समतेची संकल्पना ही केवळ तात्त्विक नव्हती, तर ती प्रत्यक्ष कृतीतून साकारलेली होती.

### शिक्षणाची ज्योत : अज्ञानातून मुक्तीचा मार्ग

महात्मा फुले यांनी घेतलेला सर्वात क्रांतिकारी निर्णय म्हणजे शिक्षणाचा प्रसार. त्यांनी प्रथम स्वतःच्या पत्नीला सावित्रीबाई फुले यांना शिक्षित केले आणि त्यानंतर १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. सावित्रीबाईनीही समाजाच्या विरोधाला न जुमानता स्वतःला शिक्षणासाठी वाहून घेतले. शेण गोट्याचा मार सहन करत सावित्रीबाईनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला. जोतीबा आणि सावित्री या दांपत्याच्या त्या काळातील सामाजिक बंडामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली.त्या काळात स्त्रीशिक्षणाला तीव्र विरोध असतानाही त्यांनी मागे हटणे स्वीकारले नाही. शिक्षण हेच शोषणाविरुद्धचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे, ही त्यांची धारणा होती. या कार्यातून त्यांनी समाजातील अज्ञ–ानाची बेडी तोडण्याचा प्रयत्न केला. अविद्या हेच शोषणाचे मुख्य कारण आहे हे सांगताना त्यांनी समाजाला याबाबतचा कठोर संदेश दिला...

विद्येविना मती गेली
मतीविना नीती गेली
नितीविना गती गेली
गती विना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले...

### अन्यायाविरुद्ध बंड

त्या काळातील समाज रुढी–परंपरांच्या कठोर बंधनात अडकलेला होता. बालविवाह, सतीप्रथा, स्त्रीदास्य आणि अस्पृश्यता यांसारख्या प्रथांनी सम ाजाला जखडून ठेवले होते. महात्मा फुले यांनी या सर्व प्रथांविरुद्ध उघडपणे आवाज उठवला. त्यांनी विधवांसाठी आश्रयस्थळे उभारली, विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले आणि स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. त्यांच्या कृतीतून समाजातील महिलांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा मिळाली.



### सत्यशोधकांचा मार्ग : समतेची संघटित चळवळ

सन १८७३ मध्ये त्यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज हा भारतीय सामाजिक इतिहासातील एक महत्त्व–ाचा टप्पा ठरला. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी जातीभेद, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध संघटित लढा उभारला. सत्यशोधक समाजाने समाजाला विचार करण्याची नवी दिशा दिली. ज्यामध्ये सत्य, समता आणि बंधुता यांना केंद्रस्थानी ठेवले आहे. सत्यशोधक सम ाजाच्या मार्फत त्यांनी एक समांतर विज्ञानवादी भूमिका समाजापुढे मांडली.तत्कालीन ब्राह्मण्यवादाला झुगारून नव्या चालीरीती सम ाजाला दिल्या.

### शेतकऱ्यांचा आवाज : अन्यायाविरुद्धचा प्रहार

महात्मा फुले यांनी केवळ सामाजिकच नव्हे, तर आर्थिक विषमतेवरही भाष्य केले. त्यांच्या “शेतकऱ्यांचा आसूड” या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांच्या दुःखाचे अत्यंत वास्तव चित्रण केले आहे. महसूल व्यवस्थेतील अन्याय, सावकारशाहीचे शोषण आणि प्रशासनातील दुर्लक्ष यावर त्यांनी कठोर टीका केली. शेतकरी हा समाजाचा कणा असूनही त्याचे जीवन दारिद्र्यात का अडकले आहे, हा प्रश्न त्यांनी समाजासमोर उभा केला.

### लेखनातून घडवलेले परिवर्तन

महात्मा फुले हे केवळ कृतीशील समाजसुधारक नव्हते, तर प्रभावी लेखकही होते. “गुलामगिरी” या ग्रंथातून त्यांनी जातीव्यवस्थेवर प्रखर प्रहार केला, तर “सार्वजनिक सत्यधर्म” मधून मानवतावादी धम ाची संकल्पना मांडली. त्यांच्या लेखनातून समाजाच्या डोळ्यांत अंजन घालण्याचे कार्य झाले. यातून त्यांच्या विचारांची व्यापकता स्पष्ट होते. याशिवाय त्यांनी गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड, ब्राह्मणांचे कसब, तृतीय रत्न, सार्वजनिक सत्य धर्म, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पोवाडा लिहून शिवरायांच्या कार्यकर्तुत्वाची ओळख करून दिली. रायगडावरील छत्रपती शिवरायांच्या समाधीची स्वच्छता केली. शिवाजी महाराजांच्या स्मृती पुनरुज्जीवनाच्या प्रारंभीच्या प्रयत्नांपैकी एक महत्त्वाचे व्यक्तिम त्त्व त्यांना मानले जाते.

### सार्वजनिक जीवनातील योगदान

महात्मा फुले यांनी सार्वजनिक जीवनातही सक्रिय सहभाग घेतला. पुणे महानगरपालिकेच्या कार्यातून त्यांनी नागरी प्रश्नांवर काम केले. पाणीपुरवठा, स्वच्छता आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे त्यांनी लक्ष दिले. त्यांनी ब्रिटिश प्रशासनाशी संवाद साधून साम ाजिक प्रश्न मांडले आणि वंचित घटकांसाठी न्यायाची मागणी केली. शासन कोणतेही असो, ते न्याय्य आणि लोकहितकारी असले पाहिजे, ही त्यांची भूमिका होती. हंटर शिक्षण आयोगाकडे त्यांनी निवेदन सादर केले. सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार केला.

### सामाजिक सुधारणा स्वीकारल्या

इंग्रजांच्या काही सामाजिक सुधारणांना स्वीकारताना त्यांनी इंग्रजांच्या अन्यायकारक नीतीवर सडकून टीका केली. एवढेच काय इंग्रजांना समजेल अशा भाषेत त्यांनी त्याची उत्तरे दिली. कोणताही पहिला प्रयोग स्वतःच्या घरी, स्वतःच्या कुटुंबावर करून मबोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊलेफ असा आदर्श त्यांनी समाजामध्ये निर्माण केला आहे. स्वतःच्या पत्नीला शिकवले. स्वतःची विहिर मागास वर्गीयांसाठी खुली केली.

ब्राह्मण्यवादाचा आयुष्यभर विरोध करुनही त्यांनी एका ब्राह्मण विधवेच्या मुलाला दत्तक घेऊन समाजापुढे आदर्श निर्माण केला. त्या मुलाचे आंतरजातीय लग्न लावून देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. महात्मा जोतीबा फुले यांनी घेतलेले निर्णय अशा प्रकारे कायम प्रेरणादायी आहेत. महात्मा ज्योतिबा फुले हे स्वतः च्या मुलाचा आंतरजातीय विवाह करणारे पहिले पालक ठरले आहेत. काळाची पावले ओळखून नवनव्या प्रयोगाद्वारे सामाजिक सुधारणा करण्यात भारतातल्या सर्व सामाजिक सुधारणा करणाऱ्या थोर पुरुषांमध्ये, त्यामुळे महात्मा जोतीबा फुले वेगळे ठरले आहेत.

### यशस्वी व्यावसायिक

सामाजिक कार्य, संघटना सुरु ठेवण्यासाठी आर्थिक स्त्रोत मजबूत असणे आवश्यक असते. त्यासाठी अंगी व्यावसायिक कसब बाळगणे खूप गरजेचे असते. संघटना, चळवळी, सुधारणांचा डोलारा चालविण्यासाठी पैशाची गरज असते. त्यासाठी आदर्श पद्धतीने व्यवसाय करुन स्वयंपूर्ण होणे गरजेचे असल्याचे महात्मा ज्योतिबा फुले यांनी सोदाहरणासह मांडून ठेवले. त्यांनी कंत्राटदार म्हणून अतिशय उत्तमपणे काम केले. आजही त्यांच्या सहभागात तयार झालेल्या वास्तू प्रेरक आहेत. पूल, धरणे, कालवे या बांधकामात कंत्राटदार म्हणून त्यांनी काम केले.

### आजच्या काळातील प्रासंगिकता

महात्मा जोतीबा फुले यांच्या कार्याला दीडशे वर्षांहून अधिक काळ लोटला असला तरी त्यांच्या विचारांची प्रासंगिकता आजही तितकीच आहे. शिक्षणातील विषमता, सामाजिक भेदभाव आणि स्त्रीसमानतेचे प्रश्न अद्यापही पूर्णतः संपलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रसार आणि आचरण करणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या कार्याचा अभ्यास केल्यास समाजपरिवर्तनासाठी आवश्यक असलेली दृष्टी मिळते.

### जोतीराव परिवर्तनाची अखंड प्रेरणा

महात्मा ज्योतिराव फुले हे एक व्यक्तिमत्त्व नसून एक चळवळ, एक विचारधारा आणि एक प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांच्या कार्यातून राजर्षि छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रे–रणा घेतली. त्यांच्या कार्यामुळेच म हाराष्ट्राला फुले–शाहू–आंबेडकरांचा महाराष्ट्र ही ओळख प्राप्त झाली आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांच्या विचारांचे स्मरण करणे म्हणजे केवळ आदर व्यक्त करणे नव्हे, तर त्या मूल्यांना आपल्या जीवनात रुजवण्याचा संकल्प करणे होय.

महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात विशेष समिती स्थापन केली असून वर्षभर महात्मा जोतीबा फुले यांच्या जीवनकार्याला साजेशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यांच्या विचारांचा प्रसार करून सामाजिक समतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा हा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न ठरणार आहे.

-प्रवीण टाके
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
कोल्हापूर,९७०२८५८७७७

# पेशवाईच्या समाप्तीमुळे महात्मा फुल्यांचा शिक्षणाचा मार्ग मोकळा-अजाब शास्त्री



**गोंदिया :–** क्षुद्र शिकणार नाहीत, त्यांनी त्यांच्या जा–तीनुसार कामधंदे करावे अशी व्यवस्था असताना, पेशवाईचा नायनाट झाल्यामुळेच महात्मा ज्योतिबा फुल्यांसाठी शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला,त्यामुळेच आम्हीही शिकू शकलो असा ठाम विश्वास विद्वान वक्ते अजाब शास्त्री यांनी व्यक्त केला. येथील मरार समाज भवनात आयोजित महात्मा फुल्यांच्या १९९ जयंती प्रीत्यर्थ आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून शास्त्री बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मरार समाज कल्याण समितीचे अध्यक्ष आत्माराम पाचे हे होते. मंचावर डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अरविंद भावे, सहयोग समुहाचे व्यवस्थापकीय संचालक रमन रामादे, मनोज भांडारकर ( सी.ए. ), नगरसेवक अमर रंगारी, सुनील भरणे उपस्थित होते.

अजाब शास्त्री पुढे बोलताना म्हणाले की, या देशात महिलांना शिक्षण नव्हतं, फुल्यांच्या विचारात क्षुद्र आणि अति क्षुद्र हे दोनच शब्द मिळतात. भारतीय संविधान लागू झाल्यानन्तर क्षुद्राना ओ.बी.सी.समजण्यात आलं, त्यापूर्वी ते क्षुद्र म्हणूच त्यांची गणना होती. महाभारत काळात गुरु द्रोणाचार्य यांनी एकलव्य हा आदिवासी असल्यामुळे त्याला धनुर्विद्येचे शिक्षण नाकारलं एवढी वाईट अवस्था होती . या देशात इंग्रज येऊन चाललेही गेले असते परंतु आम्हाला शिकविलं असतं कोणी? असा प्रश्न उपस्थित करुण शास्त्री पुढे म्हणाले की, शिक्षण म्हणजे प्रश्न निर्माण करण्याचा मार्ग होय, जे प्रश्न निर्माण करीत नाहीत ते आपला फक्त उदरनिर्वाह करतात.महात्म ा फुले हे सामाजिक परिवर्तनाचे जनक आहेत असे सांगून शास्त्री म्हणाले की,त्यांनी सावित्रीमाईला शिकवलं,फुल्यांनी पाण्याचा हौद खुला केला. सत्यशोधक समाजाची स्थापना केली, विधवा विवाह सुरु केलं,ते पुढे म्हणाले की, भारतीय राज्यघटना म्हणजे महात्मा फुल्यांचे आंदोलन होय. कारण महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोडबील लिहलं हे फुल्यांच्याच विचारातून लिहलं गेलं असे ते म्हणाले . दीनबंधू वृत्तपत्राच्या माध्यमातून महात्मा फुल्यांनी विषमतेला खड्डयात पुरलं, परिणामी सामाजिक परिवर्तनाच्या लढाईत ओबीसी समाजाने पुढे यावे असे आवाहन त्यांनी केलं. महात्मा फुल्यांचे आंदोलन हे क्षुद्राच्या शिक्षणासाठी असताना हे आंदोलन हाणून पाडण्यासाठीच आता शाळा बंद करण्याचा सपाटा महाराष्ट्र शास–नाने सुरु केला आहे. यावर त्यांनी चिंता व्यक्त केली.या प्रसंगी नगरसेवक सुनील भरणे यांनीही मार्गदर्शन केलं.

दरम्यान गोंदिया शहरात रॅलीचे आयोजन करुण क्रांती सूर्याचा – जन्म झाला ज्योतिबा फुल्यांचा या संगीताच्या ताल–ावर तरुणाई थिरकली.कार्यकर्त्यांच्या हातातील निळे,पिवळे झंडे डऊलाणे डोलत होते.विविध ठिकाणी महापुरुषांना माल्यार्पण करुण अभिवादन करण्यात आलं.

कार्यक्रमाचे संचालन श्री देशमुख यांनी करुण श्री ठाकरे यांनी आभार मानलं.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी,डॉ आंबेडकर सार्व.जयंती समिती आणि मरार समाज कल्याण समितीच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय महामार्गाची समस्या लागणार मार्गी



**गोंदिया :–** खा. प्रफुल्ल पटेल दोन दिवस भंडारा–गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. यादरम्यान कार्यकर्ते व नागरिकांकडून प्राप्त झालेल्या विविध सूचना आणि राष्ट्रीय महामार्गाशी संबंधित समस्यांची त्यांनी गांभीर्याने दखल घेतली. ८ एप्रिल रोजी नागपूर येथे त्यांनी नॅशनल हायवेच्या प्रमुख अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश दिले.

नागपूर येथे झालेल्या बैठकीत त्यांनी विविध महत्त्वाच्या कामांवर चर्चा केली. कोहमारा ते गोंदिया रस्त्याचे चौपदरीकरण, कांक्रिटीकरण करणे, गोंदिया– तिरोडा मार्गावरील काचेवानीजवळील उड्डाणपूल तातडीने पूर्ण करणे, गोंदिया शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता भागवतटोला ढाकणी–नंगपुरामूरी–पिंडकेपार–कोहमारा नवीन रस्ता तयार करणे.

रावणवाडी–कामठा–आमगाव–कोहमारा या मार्गाला राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ शी जोडणाऱ्या बाह्यवळण मार्गाचा डीपीआर तयार करण्याचे निर्देश या वेळी दिले. सारस चौक ते फुलचूर नाका या रस्त्याचे बांधकाम व विद्युतीकरण लवकर पूर्ण करणे, बालाघाट टी–पॉईट, मरारटोली–तिरोडा रोड आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या उड्डाणपुलांच्या प्रस्तावित कामांच्या त्रुटी दूर करून गती देण्यावर भर देण्यात आला.

सर्व प्रलंबित कामांमधील त्रुटी दूर करून तातडीने कामे पूर्ण करण्याच्या सूचना खा. प्रफुल पटेल यांनी राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांना दिल्या. यामुळे बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित असलेला प्रश्न आता मार्गी लागणार आहे.

# कायदे मंडळात महिलांच्या सहभागासाठी “नारी शक्ती वंदन” अधिनीयम



विविधतेने नटलेला भारतदेश हे या देशाचे बलस्थान आहे. या देशाची युवा शक्ती आणि महिला शक्तीही खास वैशिष्ट्य आहे. स्टार्टअप्सच्या माध्यमातून युवकांनी उद्योगांची धुरा सांभाळत आर्थिक आघाडीवर पुढाकार घेतला तसाच तो महिलांनीही विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत महिला शक्तीचे महत्व अधोरेखित केले आहे. त्यांच्या प्रगतीला अधिक चालना देण्यासाठी व २०४७ मध्ये विकसित भारताची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी महिलांचे योगदान व सहभाग वाढविण्याकरिता केंद्रशासनाने संसदेत “नारी शक्ती अधिनीयम’ पारित केला. राष्ट्रपतींच्या स्व–ाक्षरीने त्याचे विधेयकात रुपांतर झाले आहे. येत्या काळात संसद आणि राज्यांच्या विधिमंडळात महिलांना ३३ टक्के प्रतिनिधीत्व मिळण्याच्या प्रक्रियेची प्रत्यक्ष अंम लबजावणी होण्याच्यादृष्टीने चर्चा व सर्वानुमते त्यावर शिक्कामोर्तब होण्याकरिता १६ ते १८ एप्रिल २०२६ दरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलविण्यात आले आहे. या अधिवेशनात नारी शक्ती अधिनीयमावर चर्चा होणार आहे. तेव्हा हा अधिनीयम नेमका काय आहे त्यावर प्रकाश टाकणारा हा लेख :

संसदेच्या दोन्ही सभागृहांद्वारे राज्यघटनेच्या १२८व्या संशोधनाद्वारे पारीत विधेयकाचे राज्यघटनेच्या अनुच्छेद १११ नुसार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या स्वाक्षरीने २८ सप्टेंबर २०२३ रोजी “नारी शक्ती वंदन अधिनियम–२०२३’ चे ऐतिहासिक व महत्वपूर्ण कायद्यात रुपांतर झाले. तत्पूर्वी, हे विधेयक १९ सप्टेंबर २०२३ रोजी संसदेचे कनिष्ठ सभागृह लोकसभेत तर २१ सप्टेंबर २०२३ रोजी वरिष्ठ सभागृह राज्यसभेत मंजूर झाले. आता या अधिनीयमास राज्य घटनेचे १०६ संशोधन म्हणून अधिकृत मान्यता मिळाली आहे.

लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के प्रतिनिधीत्व मिळवून देण–ारे नारी शक्ती वंदन हे विधेय संसदेच्या नवीन इमारतीत पारीत झालेले पहिले विधेयक ठरले हे ही वेशिष्ट्यपूर्ण आहे. म्हणजे नवीन संसदेतील विधेयक मंजुरीची सुरुवातच मुळात महिला सक्षम ीकरणाच्या निर्णयाने झाली आहे. विशेष करून या विधेयकामुळे आदीपासून अनुसूचित जाती व जमातीतील महिलांसाठी राखीव असलेल्या जागा आता या आरक्षणाअंतर्गत येणार आहेत.या विधेयकाला राज्यांच्या मंजुरीची आवश्यकता नाही, कारण त्यामुळे संसदेतील राज्यांच्या जागांच्या मूळ संख्येत बदल होत नाही त्यामुळे संसदेतील राज्यांच्या प्रतिनिधित्वावर कोणताही परिणाम होणार नाही.

### या विधेयकाच्या इतिहासावर एक नजर

संसदेत १९९३ मध्ये पारीत राज्य घटनेच्या ७३व्या आणि ७४ व्या दुरुस्तीनुसार ग्रामपंचायती आणि नगर पालिकांचा समावेश करण्यात आला. तसेच या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी १/३ (एक तृतियांश) जागा आरक्षीत करण्यात आल्या. मात्र, राज्यघटनेत लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभेतील महिलांच्या आरक्षणाबद्दल कोणतीही तरतूद करण्यात आली नव्हती. पण, राज्यघटनेत दुरुस्तीकरून महिलांना संसद आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये आरक्षण देण्यासंदर्भात अनुक्रमे वर्ष १९९६,१९९८,१९९९ आणि २००८ मध्ये संसदेत विधेयके मांडण्यात आली.

एच.डी.देवेगौडा देशाचे पंतप्रधान असतांना १९९६ मध्ये केंद्र शासनाने पहिल्यांदा महिला आरक्षण विधेयक संसदेत मांडले होते. पुढे सीमा मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे हे विधेयक सोपविण्यात आले. समितीने आपला अहवालही दिला मात्र संसदेत तो अहवाल आला नाही. पुढे पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाने संसदेत हे विधेयक मांडले पण ते मंजूर झाले नाही. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वात केंद्रशासनाने २००८ मध्ये राज्यसभेत हे विधेयक मांडले मात्र लोकसभेत ते मंजूर झाले नाही. या तिन्ही विधेयकांचा पुढील प्रवास लोकसभा भंग झाल्याने तिथेच थांबला. संसदेच्या संयुक्त समितीने १९९६ मध्ये या विधेयकाची समिक्षा केली तर २००८च्या विधेयकाची समिक्षा कार्मिक, जनतक्रार, कायदे आणि न्याय संबंधी स्थायी समितीने केली. या दोन्ही समित्यांनी महिलांसाठी जागा आरक्षित ठेवण्याच्या प्रस्तावास सहमती दर्शविली. या समित्यांनी काही शिफारसीही केल्या.

### महिलांचा सहभाग

वर्तमानात १७ व्या लोकसभेत एकूण सदस्यांपैकी महिलांचा सहभाग पाहता १५ टक्के तर राज्य विधानसभांमध्ये सरासरी ९ टक्के एवढा आहे. तत्पूर्वी, २०१५ मध्ये कायदेमंडळात महिलांच्या प्रतिनिधीत्वाबाबत एक वास्तवदर्शी अहवाल प्रकाशित झाला त्यात महिलांच्या प्रतिनिधीत्वाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली होती. आणि देशातील सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येत स्थानिक स्वराज्य संस्थेसह संसद, राज्य विधानसभा आणि मंत्रिमंडळामध्ये महिलांना कमित कमी ५० टक्के आरक्षण देण्याची शिफारस केली होती. तत्पूर्वी, २००१ मध्ये राष्ट्रीय महिला सशक्तीकरण धोरणामध्ये सांगण्यात आले होते की उच्च स्तरीय कायदेमंडळात महिलांच्या आरक्षणाबाबत विचार करण्यात यावा.

### नारी शक्ती वंदन अधिनियमाचे वैशिष्ट्ये

संसदेने पारीत केलेल्या नारी शक्ती वंदन अधिनीयमानुसार लोकसभा, राज्यसभा आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली विधानसभेत शक्य तेंव्हा एक तृतियांश जागा महिलांसाठी आरक्षित करण्यात यावे असे नमुद आहे. हाच अधिनीयम लोकसभा,राज्यसभा आणि राज्यांच्या विधानसभांमधील अनुसूचित जाती व जमातीच्या म हिलांसाठी राखीव जागांनाही लागू राहणार आहे. या अधिनियमानुसार अनुच्छेद ३३० (ए) मध्ये संशोधन करून केंद्रीय कायदेमंडळ तर अनुच्छेद ३३२ (ए) मध्ये संशोधन करून राज्यांच्या कायदेमंडळात आणि अनुच्छेद २३९ ए ए (२) (बी) नुसार राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली मध्ये महिला आरक्षणाची तरतूद करण्यात आली. यावर्षी सुरु झालेल्या राष्ट्रीय जनगणनेतील आकडयांचा आधार मानून हे आरक्षण प्रत्यक्षात येणार आहे. त्या नुसारच मतदार संघांचे परिसीमन आणि जागांचे चक्राकार पद्धतीने निश्चिती होणार आहे.

कुटुंबरुपी रथाच्या दोन चाकांपैकी पुरुषांच्या बरोबरीने महिलांना भारतीय कुटुंब व्यवस्थेत महत्वाचे स्थान आहे. यापुढेही त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी केंद्र व राज्य शासनांनी विविध योजनांच्या माध्यमातून महिला विकासारिता जोरकसपणे प्रयत्न केले आहेत. परिणामी संरक्षण, उद्योग, शिक्षण, कृषी, समाजकारण, राजकाराण, आर्थिक, वैद्यकीय, प्रशासन आदी क्षेत्रांमध्ये महिलांनी आपल्या कर्तृत्वाची छाप उमटविली आहे.आता देशात मनारी शक्ती वंदन अधिनीयमाफ्च्या माध्यमातून महिलांचा कायदेमंडळातही सहभाग व योगदान वाढणार आहे व विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्यात महिलांची महत्वाची भूमिका ठरणार आहे.

रितेश मोतीरामजी भुयार,
माहिती अधिकारी,
माहिती व जनसंपर्क, नागपूर.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# जिल्ह्यातील सर्वात शेवटच्या घटकांनाही लाभ देण्यासाठी शासन तत्पर:जिल्हाधिकारी डॉ.मंगेश गोंदावले



**देवरी :-** गोंदिया जिल्ह्यातील सर्वात शेवटच्या घटकांनाही छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचा लाभ मिळावा, यासाठी शासनाने विशेष मोहीम राबविली असून देवरी तालुक्यातील बोरगाव/बाजार येथे समाधान शिबीर आयोजित करण्यात आले असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ.मंगेश गोंदावले यांनी केले.

यावेळी लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वाटप जिल्हाधिकारी श्री. गोंदावले यांच्या हस्ते करण्यात आले. देवरी तालुक्यात शिबीर स्थळी एकूण ७१४ लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास आमदार, उपविभागीय अधिकारी कविता गायकवाड, तहसीलदार शुभम पाटील, अप्पर तहसीलदार नवनाथ कातगडे, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी पुढे म्हणाले, शासनाने आयोजित केलेले समाधान शिबिरामध्ये नागरिकांचे अधिकाधिक समस्यांचे निराकरण व्हावे, असा मानस आहे. शासकीय कार्यालयात वारंवार नागरिकांच्या फेऱ्या वाढू नये. त्यांचे समाधान तत्काळ एकाच ठिकाणी व्हावे या संकल्पनेतून या शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. पहिल्या टप्प्यातील या दुसऱ्या भागात नागरिक अधिक जागृत झाले असून ते या शिबिरांचा लाभ निश्चितच घेतील, अशी आशाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

या शिबिरात आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत माहिती देणारे दालन लावण्यात आले होते. तसेच या भागातील आदिवासी नागरिकांमध्ये असणारा ॲनिमियाचीही चाचणी करण्यात आली. त्याचप्रमाणे सिकलसेलची चाचणी करणारे दालन उभारण्यात आले होते.

## जिल्ह्यात महाराजस्व समाधान शिबिरात एकूण ७६५४ प्रकरणांचा निपटारा

लागलेल्या शिबिरामध्ये एकूण ७१४ लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. जिल्हाधिकारी श्री. गोंदावले नुकतेच रुजू झाले असून महासमाधान शिबिरासाठी त्यांनी जिल्ह्यातील आदिवासी भाग असलेल्या देवरी तालुक्याची निवड केली हे विशेष.

अर्जुनी मोरगाव तालुक्यात झालेल्या शिबिरामध्ये १४९७ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. गोंदिया तालुक्यात ४७६ प्रकरणांचा निपटारा झाला. तिरोडा तालुक्यात ३३२८ बाबींचा झाला निपटारा. गोरेगाव तालुक्यात एकूण ५१० लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. आमगाव तालुक्यात १५९ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. सालेकसा तालुक्यात एकूण ८३१ विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. तर सडक अर्जुनी तालुक्यात १३९ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

झालेल्या समाधान शिबिरामध्ये निकाली काढण्यात आलेल्या विविध दाखल्यांमध्ये फेरफार दाखले, ७/१२ मधील दुरुस्ती, डिजीटल ७/१२, ८-अ उतारा, विविध प्रमाणपत्र, एक खिडकी योजनेंतर्गत निकाली काढण्यात आलेले अर्ज, भूसंपादन प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करुन गांव दप्तर अद्ययावत करण्यात आलेली प्रकरणे, अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करुन गांव दप्तर अद्ययावत करण्यात आलेली प्रकरणे आदींचा समावेश होता.

# साधना सप्ताहात माहिती विभागाची उल्लेखनीय कामगिरी,नागपूर-अमरावती विभाग अग्रेसर

**नागपूर :-** केंद्र शासनाने क्षमता विकास आयोग (सीबीसी) आणि-कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मसाधना सप्ताहातफ माहिती आणि जनसंपर्क विभागाच्या नागपूर व अमरावती विभागाने अग्रेसर राहून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

गतिमान प्रशासनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग व्हावा या उद्देशाने २ ते १० एप्रिल दरम्यान राज्यात ङ्गसाधना सप्ताहफ्आयोजित केला होता. राज्यातील सर्व खात्यांचे अधिकारी- कर्मचारी या सप्ताहात सहभागी झाले होते. सर्वसामान्य जनतेला शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमांद्वारे सोयी, सुविधा, लाभ आदी पोचविण्यासाठी शासन सक्षमपणे कार्य करते आणि या व्यवस्थेची भिस्त असणारी प्रशासन व्यवस्था त्यामुळेच सक्षम असावी लागते. सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करता यावा यासाठी विविध प्रशिक्षणांद्वारे क्षमता विकास करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने हा उपक्रम आयोजित केला होता. महाराष्ट्रात मंत्रालयीन व राज्यभरातील विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी मसाधना सप्ताहफअंतर्गत ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात १०० दिवसांचा प्रशासकीय सुधारणा कार्यक्रम आणि १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला आहेच आता आता केंद्रशासनाच्या मसाधना सप्ताहाफ्तही राज्याची कामगिरी उल्लेखनीय आहे.




मकर्मयोगी भारतफ हा केंद्र शासनाचा एक डिजिटल प्लॅटफ फॉर्म व अभिनव राष्ट्रीय उपक्रम आहे. या प्लॅटफफॉर्मवर विविध ५० प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध करून देण्यात आले होते. सप्ताहाअंतर्गत प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी यादीतील एकूण प्रशिक्षण कार्यक्रमांपैकी किमान चार तासांचे प्रशिक्षण करणे अनिवार्य होते.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर विभागातील ४७ अधिकारी- कर्मचारी यांनी एकूण २९७ अभ्यासक्रम पूर्ण केले. अमरावती विभागातील अधिकारी- कर्मचारी यांनी १ हजार ४१६ तासांपेक्षा अधिक कालावधीचे ३५४ अभ्यासक्रम पूर्ण केले. हे दोन्ही विभाग मिळून एकूण ६५१ अभ्यासक्रम पूर्ण करीत नागपूर व अमरावती विभाग अग्रेसर ठरले राहिले आहेत. सदर प्रशिक्षणासाठी माहिती विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक श्री. ब्रिजेश सिंह यांचे मार्गदर्शन लाभले.

# तिरोडा शहराच्या विकासासाठी सिटी सर्व्हेवर भर



**तिरोडा:-** शहराच्या नियोजनबद्ध व सर्वांगीण विकासासाठी सिटी सर्व्हे प्रक्रियेला गती देण्याच्या दृष्टीने येथील नगर परिषदेत गुरुवारी (ता. ९) एक महत्त्वपूर्ण बैठक आमदार विजय रहांगडाले यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी तसेच भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

शहरातील मालमत्ता नोंदी अधिक स्पष्ट, अचूक व सुसूत्र करण्यासाठी सिटी सर्व्हे ही अत्यंत आवश्यक प्रक्रिया असल्याचे आमदार विजय रहांगडाले यांनी अधोरेखित केले. नागरिकांच्या मालकी हक्कांचे संरक्षण, शासकीय नोंदींची अचूकता व भविष्यातील विकास आराखड्यांची प्रभावी अंमलबजावणी यासाठी सिटी सर्व्हेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीदरम्यान शहरातील सध्याच्या सर्व्हे स्थितीचा आढावा घेत त्यांनी प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

यावेळी नगराध्यक्ष अशोक असाटी, उपाध्यक्ष राजेश गुनेरिया, सभापती देवेंद्र तिवारी तसेच लिटल फ्लावर शाळेचे मुख्याध्यापक रोहित प्रामुख्याने उपस्थित होते.

# नाट्यगृह बांधकामासाठी १४ कोटींचा निधी मंजूर

## गोपालदास अग्रवाल यांचा पाठपुरावा : याच महिन्यात निधी उपलब्ध होणार, मुख्यमंत्र्यांचे निर्देश





**सन २०१४ पासून रखडले होते नाट्यगृहाचे बांधकाम**

**नाट्यगृह पूर्णपणे वातानुकूलित राहणार आहे. त्याच्या विद्युत, देखभाल खर्चासाठी नगरपरिषद शॉपिंग कॉम्प्लेक्सचे बांधकाम मंजूर करून घेतले आहे. मुंबईतील वानखेडे स्टेडियमसारखे डिझाइन देशविख्यात वास्तुकार शशी प्रभू यांनी तयार केले असून, १००० दर्शक क्षमता व ३० हून अधिक दुकानांचा समावेश आहे. २०१४ नंतर राजकीय बदलांमुळे निधीअभावी कामाची गती मंदावली, ज्यामुळे खर्च वाढला तसेच आधुनिक तंत्रज्ञानामुळे अतिरिक्त निधी आवश्यक झाला. माजी आ.गोपालदास अग्रवाल यांच्या विनंतीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ १४ कोटी निधी देण्याचे निर्देश दिले आहेत.**

**गोंदिया :-** शहरातील रेलटोली परिसरातील निर्माणाधीन सांस्कृतिक नाट्यगृहाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोंदिया नगर परिषदेला १४ कोटींचा अतिरिक्त निधी मंजूर केला आहे. तसेच हा निधी एप्रिल महिन्यातच उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे नाट्यगृहाच्या रखडलेल्या बांधकामाला आता गती येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

गोंदिया शहरातील नाट्यगृहाचे बांधकाम निधीअभावी रखडले होते. याची दखल घेत माजी आ. गोपालदास अग्रवाल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यासाठी पाठपुरावा केला. तसेच नगर परिषदेच्या माध्यमातूनही यासंदर्भात प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्याचीच दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील आठवड्यात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्माणाधीन सांस्कृतिक नाट्यगृहाचे काम पूर्ण करण्यासाठी १४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करुन तो निधी याच महिन्यात उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले.

नगरविकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, प्रधान सचिव नगरविकास व प्रधान सचिव वित्त विभाग यांना तात्काळ निधी वितरणाचे आदेश असल्याने आता हे भव्य वास्तू लवकर पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

शहरातील हे नाट्यगृह माजी आ. गोपालदास अग्रवाल यांच्या कार्यकाळातील प्रमुख प्रकल्पांपैकी एक होय. गुजराती शाळेजवळील रेलटोली येथील जिल्हा परिषदेची जागा निःशुल्क नगर परिषदेला उपलब्ध करून दिली. त्यांनी राज्य सरकारकडून आधुनिक नाट्यगृहाचे बांधकाम मंजूर करून घेतले असून, सध्या काम अंतिम टप्प्यात आहे.

# शाळेचा गेट कोसळून विद्यार्थिनीचा मृत्यू..!

**तिरोडा:-** तालुक्यात एक अत्यंत धक्कादायक आणि दुःखद घटना घडली आहे. तिरोडा येथील नगरपरिषदद्वारा संचालित पीएम श्री राणी अवंतीबाई प्राथमिक शाळा, लोधीटोला येथे शनिवारी (११ एप्रिल) दुपारी शाळेचा गेट अचानक कोसळल्याने पाचवीत शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीचा दुर्दैवी मृत्यू झाला.

मृत विद्यार्थिनीचे नाव कुमारी निराली मनीष चाफले (वय ११ ) असे असून, ती शाळेतून सुटल्यानंतर बाहेर पडत असताना ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, शाळेचा मुख्य गेट गेल्या काही वर्षांपासून जीर्ण अवस्थेत होता. त्याच्या दुरुस्तीचा प्रस्तावही करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना त्या गेटपासून दूर राहण्याच्या सूचना दिल्या गेल्या होत्या, मात्र प्रत्यक्षात त्यावर ठोस उपाययोजना करण्यात आली नव्हती.

शाळा सुटल्यानंतर विद्यार्थी बाहेर पडत असताना अचानक गेट कोसळले. या दुर्घटनेत निराली गेटखाली दबली गेली आणि ती गंभीर जखमी झाली. तिला तातडीने तिरोडा येथील एका खाजगी रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी दाखल करण्यात आले. तिची प्रकृती अत्यंत चिंताजनक झाल्याने पुढील उपचारासाठी गोंदिया येथे रेफर करण्यात आले. मात्र, गोंदियाला नेत असतानाच रस्त्यात तिचा मृत्यू झाला. निराली ही एक अत्यंत हुशार आणि गुणी विद्यार्थिनी होती. तिने राज्यस्तरीय प्रज्ञाशोध स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत राज्यात चौथा क्रमांक मिळवला होता. काही दिवसांपूर्वीच तिचा पुणे येथे सन्मानही करण्यात आला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, निरालीची आई शुभांगी चौधरी चाफले या त्याच शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.ही घटना शाळांमधील सुरक्षेच्या उपाययोजनांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरली आहे.






# अतुलनीय नायक भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील सामाजिक चळवळीचे सर्वश्रेष्ठ नायक आहेत. भारतातीलच नव्हे तर वैश्विक संदर्भातही बाबासाहेबांचे मानवमुक्तीचे कार्य संपूर्ण जगातील सामाजिक चळवळीसाठी कायम मार्गदर्शक आणि प्रेरणादायी राहील यात शंका नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विश्वनायक पदापर्यंतच्या प्रवासाचा मूलाधार जर कोणता असेल तर तो आहे त्यांचे शिक्षण... त्यांचा विद्याव्यासंग त्यांचे ग्रंथवेड... डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रकांड पंडित होते. अनेक विषयांवर सखोल अध्ययन करून अत्यंत मूलगामी चिंतन त्यांनी मांडले, सिद्धांत मांडले आणि आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांनी मांडलेले मौलिक विचार आजही प्रमाण आहेत.

पिढ्यानब पिढ्या शिक्षणापासून वंचित राहिलेला समाज, अविद्येच्या गर्तेत सापडलेला समाज ह्या दुष्टचक्रामुळे संवेदना हरवून बसला होता.

**"उद्धरली कोटी कुळे भीमा तुझ्या जन्मामुळे"**

डॉ. बाबासाहेब म्हणत "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो ते प्राशन करेल तो वाघासारखा गुरऽगुरल्याशिवाय राहणार नाही."

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे असे मत होते की, आपली लोकं शिक्षणात मागे असल्यामुळे शिक्षण हीच आपल्या लोकांची महत्तम गरज आहे. शिक्षण हेच त्यांच्या प्रगतीचे साधन आहे. शिक्षणाच्या अभावामुळे हा समाज अधोगतीला प्राप्त झाला आहे, स्वत्व गमावून बसला आहे, अन–उत्पादक झाला आहे. त्यामुळे शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षणाशिवाय समाजाचे कोणत्याही प्रकारचे हित साधने शक्य होणार नाही. डॉ. बाबासाहेब म्हणत–

"सर्व प्रकारच्या विषमता दूर करण्यासाठी आणि सामाजिक लोकशाही प्राप्त करून घेण्यासाठी शिक्षण हा राजमार्ग आहे. शिक्षणाचा हेतू लोकांचे नैतिकीकरण आणि सामाजिकीकरण करणे हा होता. सभ्यता आणि संस्कृती यांचा शिक्षण हा पाया होता."

**समाजाला संदेश :शिका, संघटित व्हा, संघर्ष करा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूरच्या अ.भा. दलित परिषदेप्रसंगी दिलेल्या भाषणात संदेश दिला होता, त्या भाषणाचे शेवटचे वाक्य होते.. "तुमच्या मुलांना शिक्षण द्या, हळूहळू त्यांच्या मनात महत्त्वाकांक्षा जागृत करा, ते थोर पुरुष होणार आहेत, असे त्यांच्या मनात बिंबवा, त्यांच्या हीनगंड नाहीसा करा.

शिक्षणाची कास धरून समाजाला प्रगतिपथावर घेऊन जाण्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज लक्षात घेऊन सामाजिक ऐक्य निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न होता आणि जो संघर्ष बाबासाहेबांना अभिप्रेत होता तो भौतिक लाभाकरिता किंवा सत्तेकरिता नव्हता तर तो माणसाच्या मुक्तीचा संघर्ष होता, तो आनंददायक होता, तो चैतन्यकारक होता.

**डॉ. बाबासाहेब या भाषणात म्हणतात–**

तुम्ही सर्व जन विद्या शिकण्यासाठी आला आहात. पण, माझ्या मते केवळ विद्याच पवित्र असू शकत नाही, विद्येबरोबर भगवान बुद्धांनी सांगितलेली प्रज्ञा म्हणजे शहाणपणा, शील म्हणजे सदाचार संपन्न असे आचरण, करुणा म्हणजे सर्व मानवजातीसंबंधी प्रेमभाव आणि मैत्री म्हणजे सर्व प्राणीमात्रांविषयीची आत्मियता या चार पारमिता असल्याच पाहिजे तरच विद्वतेचा काही उपयोग आहे. विद्येबरोबरच मानवाजवळ जर करुणा नसली तर तो कसाई आहे. करुणा म्हणजे माणसा माणसावरचे प्रेम! ह्याच्यापुढेही मनुष्य गेला पाहिजे व त्याने मैत्री संपादन केली पाहिजे ही विचारसरणी जर कोणी मांडली असेल तर ती भगवान बुद्धांनीच होय.

विद्या, प्रज्ञा, करुणा, शील व मैत्री या पंचतत्वानुसार प्रत्येक विद्यार्थ्याने आपले चारित्र्य बनविले पाहिजे आणि या मार्गाने एकट्यानेच जावे लागले तरी मनोधैर्य व निष्ठा राखून गेले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे शैक्षणिक विचार अत्यंत मौलिक आहेत, ते स्थलकाल निरपेक्ष आहेत. आजही ते तेवढेच चिंतनीय, अनुकरणीय व प्रेरणादायी आहेत...!!

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने महामानवास विनम्र अभिवादन !!!

**सौ.वैशाली दिलीप वाघमारे**
**बोळेगांवकर नांदेड**









































